मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# आरक्षणावरून शहर परिसरात आंदोलने सुरूच!

## मुंडण करुन राज्य सरकारचा प्रतिकात्मक दशक्रिया विधी

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।**

मराठा समाजाला आरक्षण दिले जावे, या मागणीसाठी मराठा समाज, मराठा क्रांती मोर्चा आणि सकल मराठा समाजाकडून शहर परिसरातील विविध ठिकाणी लाक्षणिक उपोषण, साखळी उपोषण, भजन गायन यासारखी आंदोलने मंगळवारीही सुरूच राहिली. भोसरी, चिखली, जाधववाडी परिसरातील व्यापाऱ्यांनी व्यवहार बंद ठेवले. मराठा क्रांती मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी स्वतः चे मुंडण करुन राज्य सरकारचा प्रतिकात्मक दशक्रिया विधी केला.




मराठा समाजाला आरक्षण देण्यास सरकार निष्क्रीय ठरत आहे, असा आरोप करत मराठा क्रांती मोर्चाच्यावतीने, चिंचवडगावातील मोरया गोसावी दशक्रिया विधी घाटावर राज्य सरकारचा प्रतिकात्मक दशक्रिया विधी करण्यात आला. या आंदोलनामध्ये मराठा क्रांती मोर्चाच्या पिंपरी-चिंचवड शहरातील कार्यकर्त्यांनी मुंडण करून सरकारचा निषेध केला. 'आमच्यासाठी शासन हे मायबाप आहे. मात्र, ज्या मागणीसाठी आम्ही गेल्या दीड महिन्यापासून संवैधानिक पद्धतीने आंदोलने करत आहोत. ती मागणी पूर्ण करण्यासाठी सरकार अपयशी ठरत आहे. त्यामुळे, हे सरकार मेले असे समजून आम्ही सरकारचा दशक्रिया विधी करत आहोत, असे मराठा क्रांती मोर्चाच्यावतीने यावेळी सांगण्यात आले. येत्या दोन दिवसांत मराठा आरक्षणाचा प्रश्न सुटला नाही; तर महाराष्ट्रात तीव्र आंदोलन उभे केले जाईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. यावेळी मराठा क्रांती मोर्चाचे कार्यकर्ते सतीश काळे, वैभव जाधव, रमेश कदम, राजाभाऊ गलांडे, संजय जाधव, प्रकाश कदम, नानासाहेब वारे, नकुल आहेर, सामाजिक कार्यकर्ते मानव कांबळे, मारुती भापकर यांच्यासह नलिनी पाटील, रत्नप्रभा सातपुते, शीतल घरत, मीरा कदम, कल्पना गिड्डे, रेखा देशमुख आदी महिला कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

दिघीमध्ये बंदला समिश्र प्रतिसाद मिळाला. सकल मराठा समाज दिघी ग्रामस्थांद्वारे आरक्षणासंबंधी पुढील दिशा ठरवण्यासाठी मंगळवारी संध्याकाळी बैठक घेऊन निर्णय घेण्यात येणार आहे. इंद्रायणीनगरमध्ये सर्व व्यवहार सुरळीत सुरू असल्याचे पहायला मिळाले.f मनोज जरांगे-पाटील त्यांच्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी चिखली, पूर्णानगर, ताम्हणे वस्ती येथील सकल मराठा समाजाच्यावतीने साखळी उपोषण चालूच आहे. मंगळवारी उपोषणाचा दुसरा दिवस ठरला. सामाजिक कार्यकर्ते विकास साने, जितेंद्र यादव, यश साने, कुंदन गायकवाड, साधना मळेकर, दिनेश यादव, संतोष मोरे, प्रदीप आहेर आणि महिलांनी साखळी उपोषणात मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. चिखली, मोरेवस्ती, म्हेत्रे वस्ती, कुदळवाडी जाधववाडी इत्यादी परिसरातील व्यापाऱ्यांनी कडकडीत बंद पाळला. सकल मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांनी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास मोरे वस्ती, चिखली परिसरात फेरी काढून जरांगे-पाटील यांना आपला पाठिंबा दर्शविला.

### भोसरीत उत्स्फूर्त बंद

» मराठा समाजाच्या आरक्षणासाठी पुकारण्यात आलेल्या 'महाराष्ट्र बंद'ला भोसरीत उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तर दिघीत संमिश्र प्रतिसाद मिळाला. भोसरीतील आळंदी रस्ता व्यापारी संघटनेने आरक्षणाला पाठिंबा देत पूर्ण बाजारपेठ बंद ठेवली. संघटनेचे अध्यक्ष नाना वाळुंज, व्यापारी बंटी ओसवाल, संतोष शहा, शरद पाटील, नितीन चोरडिया, विनोद पाचारणे, सुभाष बोत्रा, प्रसाद भांबुर्डेकर आदींसह व्यापाऱ्यांनी हुतात्मा चौकात बैठक घेत आरक्षणास पाठिंबा दिला. दिघी रोड व्यापारी संघटनेचे अध्यक्ष ॲड. राहुल गवळी यांनीही मराठा आरक्षणास पाठिंबा दिला. भोसरीतील आळंदी रस्ता, दिघी रस्ता, पीएमटी चौक, पीसीएमसी चौक आदी भागातील औषधांची दुकाने वगळता इतर दुकाने बंद ठेवण्यात आली होती.

---

# समाविष्ट गावांतील रस्त्यांच्या डांबरीकरणासाठी नोव्हेंबर अखेरची मुदत

## पावसाळ्यात डांबराचे प्रकल्प बंद होते

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।**

पाऊस, विविध वाहिन्यांसाठीचे खोदकाम, खासगी व्यक्तींनी मारलेले आडवे चर यामुळे शहरातील प्रत्येक रस्त्यावर खड्डे दिसत आहेत. काही खड्डे व आडवे चर इतके खोल आहेत, की त्यात वाहने आदळतात. वाहनांचे नुकसान होते. महापालिकेच्या नोंदीनुसार, जून ते सप्टेंबर अखेरपर्यंत सात हजार ५५७ खड्डे शहरात आढळले आहेत. पावसाळ्यामुळे डांबर प्रकल्प बंद राहत असल्याने दगड, मुरूम, माती, पेव्हिंग ब्लॉक व कोल्ड मिस्कने खड्डे बुजवत असल्याचा दावा महापालिका करते. याबाबत 'खड्डेच खड्डे, हाडमोडीचे अड्डे' असे चार ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध केले होते. त्यानंतर निविदा प्रक्रिया करून क्षेत्रीय कार्यालयस्तरावर रस्त्यांच्या डांबरीकरणाचे नियोजन महापालिकेने केले आहे. शहरातील सर्व रस्ते नोव्हेंबर अखेरपर्यंत डांबरीकरण करण्याची मुदत ठेकेदारांना दिली आहे.खड्डे, पाऊस, दुरुस्ती, डागडुजी, पुन्हा पाऊस आणि पुन्हा खड्डे, अशी स्थिती पावसाळ्याच्या चार महिन्यात शहरात होती. आता साधारण एक महिन्यापासून पाऊस थांबला आहे. हॉटमिक्स पद्धतीने खड्डे दुरुस्ती सुरू केली




आहे. मात्र, देहू-आळंदी रस्ता, राजा शिवछत्रपती चौक (वखार महामंडळ किंवा जयगणेश साम्राज्य चौक) ते वडमुखवाडी, चऱ्होली फाटा ते चऱ्होली गाव आदी भागात जलवाहिन्यांसाठी रस्ते खोदले जात आहेत. वाहिन्या टाकल्यानंतर खडीकरण व डांबरीकरण सुरू आहे. मात्र, त्याचा वेग कमी आहे. शिवाय, भोसरी पीसीएमटी चौक ते लांडेवाडी चौक, वाल्हेकरवाडी रस्ता, वाकडमधील दत्तमंदिर रस्ता आदी भागात रस्त्यांच्या काँक्रिटीकरणाची कामे सुरू आहेत. त्यासह शहरातील सर्वच रस्त्यांच्या डांबरीकरणाची कामे नोव्हेंबर अखेरपर्यंत केले जाणार आहेत. महापालिकेकडील नोंदीनुसार एक जूनपूर्वी अर्थात पावसाळ्यापूर्वी शहरात ६३३ खड्डे होते. एक जून ते ३० सप्टेंबर या पावसाळ्याच्या चार महिन्यात सात हजार ५५७ खड्डे आढळले, त्यातील सात हजार ११२ खड्डे बुजविले होते. पावसाळ्यात डांबराचे प्रकल्प बंद असल्यामुळे डांबरीकरण करता येत नाही. त्यामुळे दगड, मुरूम, माती, खडी, पेव्हिंग ब्लॉकच्या साहाय्याने पावसाळ्यात खड्डे बुजविले जातात. मात्र, त्यानंतर पाऊस झाल्यानंतर खडी, माती बाजूला पसरून त्या ठिकाणी पुन्हा खड्डा निर्माण होतो.

> "पावसाळ्यात डांबराचे प्रकल्प बंद होते. त्यामुळे माती, मुरुम, कोल्डमिस्क, पेव्हिंग ब्लॉक टाकून खड्डे भरले होते. आता पाऊस थांबल्यामुळे डांबराने खड्डे बुजविण्याचे काम सुरु आहे. त्याचे नियोजन क्षेत्रीय कार्यालयस्तरावर केले आहे. ३० नोव्हेंबरपर्यंत सर्व रस्त्यांचे डांबरीकरण करण्याचे नियोजन आहे.
>
> – मकरंद निकम, शहर अभियंता, महापालिका

# चिखलीत उभारणार छत्रपती शिवरायांचा पूर्णाकृती पुतळा ; सल्लागाराची नियुक्ती!

## भाजपाचे आमदार महेश लांडगे यांनी घेतला पुढाकार

**चिखली । न्यूज एक्सप्रेस मराठी।** पिंपरी-चिंचवडमध्ये झपाट्याने विकसित होणाऱ्या चिखली परिसरात सोनवणे वस्ती, पिंगळे रोड आणि चिंचवड- आकुर्डी लिंक रोडला जोडणाऱ्या मुख्य चौकात हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा पूर्णाकृती पुतळा बसवण्यात येणार आहे. त्यासाठी भाजपाचे आमदार महेश लांडगे यांनी पुढाकार घेतला आहे. पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने चिखलीतील प्रस्तावित



शिवाजी महाराज चौक सुशोभिकरणासाठी सल्लागार संस्थेची नियुक्ती करण्यात आली आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांचे मावळे यांचे शौर्य आणि मूल्यांची प्रेरणा नागरिकांना मिळावी, असा या प्रकल्पाचा उद्देश आहे. चिखली आणि परिसराच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरणाऱ्या चौकात छत्रपती शिवाजी महाराज यांचा सुमारे ३० फूट उंच पूर्णाकृती पुतळा उभारण्यात येईल. तसेच, मावळ्यांचे छोटे पुतळेही उभारण्यात येणार आहे. या चौकात पादचारी मार्गिका, नागरिकांना बसण्यासाठी पायऱ्या, लॉन अशा सुविधा विकसित करण्यात येणार आहेत. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्याची आणि मूल्यांचे नव्या पिढीला स्मरण व्हावे. शिव विचार तरुणांमध्ये रुजला जावा. या करिता पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाच्या पुढाकाराने चिखली आणि परिसरात छत्रपती शिवाजी महाराज यांचा पूर्णाकृती पुतळा उभारावा. तसेच, मध्यवर्ती ठिकाणी शिवाजी महाराज चौक विकसित करावा, अशी संकल्पना होती. त्यानुसार, प्रशासनाने चिखली येथे पिंगळे रोड, सोनवणे वस्ती आणि चिंचवड-आकुर्डी लिंक रोडला जोडणाऱ्या चौकाचे सुशोभिकरण करण्याचा प्रस्तावित केले आहे. प्रशासनाने सदर काम तातडीने पूर्ण करावे, असे आमदार महेश लांडगे म्हणाले.

# मोशी येथे होणार दुसरे इंद्रायणी साहित्य संमेलन!

## संमेलनाध्यक्षपदी सोपान खुडे

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** इंद्रायणी साहित्य परिषदेच्या वतीने येत्या १८ व १९ नोव्हेंबर रोजी पिंपरी चिंचवड शहरातील मोशी येथे दुसरे इंद्रायणी साहित्य संमेलन आयोजित करण्यात येणार आहे. परिषदेचे अध्यक्ष संदीप भानुदास तापकीर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत नुकताच हा निर्णय घेण्यात आला.



मोशी येथील जय गणेश लॉन्सच्या सभागृहात हे दोन दिवशीय साहित्य संमेलन होणार असून ज्येष्ठ साहित्यिक आणि लोकसाहित्याचे अभ्यासक श्री सोपानराव खुडे यांची संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली. पहिल्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष साहित्यिक अरुण बोऱ्हाडे यांनी मांडलेल्या या प्रस्तावास उपस्थित सर्वांनीच संमती दिली. तसेच या साहित्य संमेलनाचे स्वागता ध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्ते गणेश साहेबराव सस्ते यांची निवड करण्यात आली. अशोक ढोकले यांनी मांडलेल्या निवडीच्या प्रस्तावास बैठकीत सर्वांनी मान्यता दिली.

# मराठा आरक्षणासाठी कुऱ्हाडे यांचा राजीनामा

**आळंदी। न्यूज एक्सप्रेस मराठी।** राज्यात मराठा आरक्षणाच्या मागणीवरून राजकीय वातावरण तापले आहे. अनेक नेते , आमदार ,खासदार आपल्या पदाचा राजीनामा देत आहेत. यातच आज दि. ३१ रोजी आळंदीतून अजित पवार गटातील राष्ट्रवादीचे पुणे जिल्हा सरचिटणीस यांनी त्यांचा पदाचा राजीनामा दिला आहे. सकल मराठा समाजाच्या वतीने आमरण उपोषणा साठी बसलेल्या संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांना व आळंदी व महाराष्ट्रात ठिकठिकाणी चाललेल्या साखळी उपोषणास जाहीर पाठींबा दिला आहे. तसेच आज काकडे यांच्या उपोषणास ही पाठींबा दिला.जो पर्यंत माझे मराठा बांधवांना न्याय मिळत नाही तो पर्यंत हा लढा सर्वांनी मिळून लढू ,अशी तरुणांना त्यांनी विनंती केली आहे.

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कंत्राटी कर्मचाऱ्यांना सामावून घेण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेणार – डॉ. तानाजी सावंत तसेच आज साखळी उपोषणाचा सहा दिवस असून आजचे उपोषणकर्ते रमाकांत शिंदे हे आहेत. यावेळी संतोष आगे , सागर वहिले व शशिकांत जाधव उपस्थित होते. तर आज समस्त ग्रामस्थ आळंदीकरांच्या व पोलीस प्रशासनाच्या विनंती वरून श्रीकांत काकडे यांनी रात्री पावणे आठच्या सुमारास आपले आमरण उपोषण स्थगित केले .

# झोपडपट्ट्यांचा पुनर्विकास होणार!

## पालिकेच्या मालकीच्या जागेवर होणार पुनर्विकास

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पुणे शहरात खासगी बांधकाम व्यावसायिकांकडून झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा (एसआरए) विकास रखडलेला असताना आता पुणे महापालिकेने स्वतःच्या जागेवरील झोपडपट्ट्यांचा पुनर्विकास करण्याचा निर्णय घेतला आहे. महापालिकेच्या २२ भूखंडांवर झोपडपट्ट्या आहेत. पहिल्या टप्प्यात त्यातील एक ते दोन ठिकाणी 'एसआरए' राबविली जाणार आहे. पुणे शहरात तब्बल ४८६ झोपडपट्ट्या आहेत. त्यामध्ये एकूण लोकसंख्येच्या ४० टक्के लोक राहात आहेत. झोपडपट्ट्यांमध्ये कमी जागा, अस्वच्छता, स्वच्छतागृहांचा अभाव यामुळे नागरिकांचे जीवनमान कष्टाचे असते. शिवाय शहराचे बकालीकरणही वाढत असल्याने येथे राहणाऱ्या कष्टकऱ्यांना स्वतःचे हक्काचे पक्के घर असावे यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविली जाते. पुणे शहरात गेल्या २० वर्षांत फक्त ६७ योजना पूर्ण झाल्याने या योजनेचा म्हणावा तसा फायदा झालेला नाही. पुणे महापालिकेने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे २००४ मध्ये बांधकाम व्यावसायिक म्हणून नोंदणी केलेली आहे. पण स्वतः 'एसआरए' विकसित करण्याच्या दृष्टीने पाऊल उचलले नव्हते. शहरात महापालिकेच्या भूखंडावर २२ झोपडपट्ट्या आहेत, त्यात लाखो नागरिक राहत आहेत. पुणे महापालिकेने पंतप्रधान आवास योजनेतून वडगाव, हडपसर, खराडी येथे स्वतः २९१८ घरे बांधली आहेत. त्याचे नुकतेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकार्पण केले आहे. त्यामुळे पालिकेने या अनुभवाच्या जोरावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याचा निर्णय घेतला. यासाठी आजच आयुक्त विक्रम कुमार यांच्याकडे अधिकाऱ्यांची बैठक झाली. पुणे महापालिकेतून अधीक्षक अभियंता पदावरून सेवानिवृत्त झालेले सुधीर कदम यांची या झोपडपट्टी पुनर्विकासाच्या कामासाठी विशेष अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. बांधकाम विभाग, मालमत्ता व्यवस्थापन विभाग यासह इतर विभागांच्या समन्वयातून हा प्रकल्प मार्गी लागेल. ज्या क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीमध्ये झोपडपट्टी आहे, त्या कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त हे 'एसआरए'चे सक्षम अधिकारी म्हणून काम पाहतील. या योजनेतील घरासाठी पात्र व अपात्र रहिवाशांची नावे अंतिम करण्याचा अधिकारी त्यांच्याकडे असणार आहे. पुणे महापालिकेच्या मालकीच्या जागेवर झोपडपट्टी झाली आहे. त्या जागा महापालिका स्वतः विकसित करणार आहे. त्याची मंगळवारी प्राथमिक बैठक झाली आहे. जागेची मोजणी करणे, यातून किती क्षेत्र मोकळे होणार आहे. याचा अभ्यास केला जाणार आहे. यातून झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या नागरिकांना स्वतःचे चांगले घर देण्याचा प्रयत्न महापालिकेचा आहे.



### समितीला दोन महिन्यांची मुदतवाढ

» पुणे महापालिकेने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे २००४ मध्ये बांधकाम व्यावसायिक म्हणून नोंदणी केलेली आहे. पण स्वतः 'एसआरए' विकसित करण्याच्या दृष्टीने पाऊल उचलले नव्हते. शहरात महापालिकेच्या भूखंडावर २२ झोपडपट्ट्या आहेत, त्यात लाखो नागरिक राहत आहेत. पुणे महापालिकेने पंतप्रधान आवास योजनेतून वडगाव, हडपसर, खराडी येथे स्वतः २९१८ घरे बांधली आहेत. त्याचे नुकतेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकार्पण केले आहे. त्यामुळे पालिकेने या अनुभवाच्या जोरावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याचा निर्णय घेतला. यासाठी आजच आयुक्त विक्रम कुमार यांच्याकडे अधिकाऱ्यांची बैठक झाली.

# पुण्यात सव्वाबारा हजार जणांना कुणबी प्रमाणपत्र

## पुण्याचे जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांची माहिती

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र मिळावे यासाठी राज्यभर वातावरण तापले असल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कुणबी प्रमाणपत्राचे वाटप करावे, असे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना जारी केले आहेत. त्या पार्श्वभूमीवर एक जानेवारी २०२२ ते ३१ ऑक्टोबरपर्यंत (मंगळवार) एकट्या पुणे जिल्ह्यात सुमारे सव्वाबारा हजार जणांना कुणबी प्रमाणपत्र देण्यात आले आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी मंगळवारी दिली. प्रमाणपत्र देताना १९६७ पूर्वीचे महसुली पुरावे तपासण्यात आले आहेत, असेही त्यांनी स्पष्ट केले. मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी मनोज जरांगे -पाटील यांनी उपोषण सुरु केले आहे. त्यावरून राज्यात वातावरण चांगलेच तापले आहे. त्यांच्या उपोषणाला सकल समाजातून पाठिंबा मिळत आहे. गावोगावातून उपोषणाला नागरीक बसले आहेत. त्यावरून अनेक जिल्ह्यांतून कुणबी प्रमाणपत्र देण्याची मागणी वाढली आहे. त्या पार्श्वभूमीवर, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही मंगळवारी राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याचे आदेश जारी केले आहेत. महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनीही या संदर्भात सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांची दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक घेतली. त्यांनीही असे आदेश दिले आहेत. राज्यात कुणबी प्रमाणपत्र देण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले. असले तरी पुणे जिल्ह्यात कुणबी प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही यापूर्वीच करण्यात आली होती. एक जानेवारी २०२२ ते ३१ ऑक्टोबर या काळात सुमारे १२ हजार ९११ एवढे अर्ज आले होते. महसुली पुरावे तपासून त्यातील १२ हजार २९४ जणांना आतापर्यंत कुणबी प्रमाणपत्र देण्यात आले आहेत.



### प्रमाणपत्र देण्याची मागणी वाढली

» मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी मनोज जरांगे -पाटील यांनी उपोषण सुरु केले आहे. त्यावरून राज्यात वातावरण चांगलेच तापले आहे. त्यांच्या उपोषणाला सकल समाजातून पाठिंबा मिळत आहे. गावोगावातून उषोषणाला नागरीक बसले आहेत. त्यावरून अनेक जिल्ह्यांतून कुणबी प्रमाणपत्र देण्याची मागणी वाढली आहे. त्या पार्श्वभूमीवर, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही मंगळवारी राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याचे आदेश जारी केले आहेत. महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनीही या संदर्भात सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांची दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक घेतली. त्यांनीही असे आदेश दिले आहेत.

# भिडे वाड्यासंदर्भातील खटला आता सर्वोच्च न्यायालयात!

## स्मारकाच्या कामात अडथळा; पालिकेकडून अगोदरच कॅव्हेट दाखल





**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** ऐतिहासिक भिडे वाड्याचे स्मारक करण्याच्या पालिकेच्या प्रयत्नात पुन्हा नवा अडथळा निर्माण झाला आहे. या वाड्याचे स्मारकात रूपांतर करण्याच्या आणि त्यापोटी रहिवासी व भाडेकरूंना देय मोबदल्यासंदर्भात उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाला रहिवासी व भाडेकरूंनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. न्यायालयाने ते दाखल करून घेतले आहे. दरम्यान, महापालिकेने पूर्वीच सर्वोच्च न्यायालयात कॅव्हेट दाखल केले आहे. महात्मा जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी शिवाजी रस्त्यावरील भिडे वाडा येथे मुलींची पहिली शाळा सुरू केली होती. मात्र, हा वाडा आता मोडकळीस आला आहे. त्यामुळे त्याचे स्मारक करण्याचा निर्णय पालिकेने घेतला. मात्र, त्याला जागामालक व पोटभाडेकरूंनी उच्च न्यायालयात आव्हान दिले. उच्च न्यायालयाने ही याचिका निकाली काढत महापालिकेने यापूर्वी केलेल्या निवाड्यानुसार तसेच २०१३ मधील कायद्यानुसार जागेचा मोबदला देण्याचे आदेश न्यायालयाने दिले. या निर्णयाचे सर्वत्र स्वागत झाले. मात्र, संभाव्य कायदेशीर अडचणींचा विचार करत सावधगिरीचा उपाय म्हणून महापालिकेने सर्वोच्च न्यायालयात कॅव्हेट दाखल केली. तसेच भूसंपदानासाठी पुढील कार्यवाही देखील सुरू केली. दरम्यान, उच्च न्यायालयाच्या या निर्णयाविरोधात रहिवासी आणि व्यावसायिकांनी काल सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केले. न्यायालयाने संध्याकाळी उशिरा अपील दाखल करून घेतले. भिडे वाड्यातील रहिवासी आणि व्यावसायिकांनी सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केले आहे. महापालिकेने पूर्वीच कॅव्हेट दाखल केले आहे. या प्रकरणी आम्ही माहिती घेऊन पुढील कार्यवाही करू, असे महापालिकेच्या मुख्य विधी अधिकारी निशा चव्हाण यांनी सांगितले.

### जागेचा मोबदला देण्याचे आदेश

» महात्मा जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी शिवाजी रस्त्यावरील भिडे वाडा येथे मुलींची पहिली शाळा सुरू केली होती. मात्र, हा वाडा आता मोडकळीस आला आहे. त्यामुळे त्याचे स्मारक करण्याचा निर्णय पालिकेने घेतला. मात्र, त्याला जागामालक व पोटभाडेकरूंनी उच्च न्यायालयात आव्हान दिले. उच्च न्यायालयाने ही याचिका निकाली काढत महापालिकेने यापूर्वी केलेल्या निवाड्यानुसार तसेच २०१३ मधील कायद्यानुसार जागेचा मोबदला देण्याचे आदेश न्यायालयाने दिले. या निर्णयाचे सर्वत्र स्वागत झाले. मात्र, संभाव्य कायदेशीर अडचणींचा विचार करत सावधगिरीचा उपाय म्हणून महापालिकेने सर्वोच्च न्यायालयात कॅव्हेट दाखल केली. तसेच भूसंपदानासाठी पुढील कार्यवाही देखील सुरू केली.

# राज्यातील कापूस उत्पादनात ३० टक्क्यांपर्यंत घट!

## बिगरमोसमी पाऊस न झाल्याचा परिणाम



**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** पावसाने ऑगस्ट महिन्यात दिलेली उघडीप, मोसमी आणि बिगरमोसमी पाऊस न झाल्यामुळे राज्यातील कापूस उत्पादनात ३० टक्क्यांहून अधिक घट येण्याचा अंदाज आहे. मराठवाड्यात उत्पादनात मोठी तूट येण्याची शक्यता आहे. विदर्भात मात्र समाधानकारक उत्पादनाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

मांडाखळी (ता. जि. परभणी) येथील रमेश राऊत कापूस उत्पादनाविषयी म्हणाले, की मराठवाड्यात सिंचनाची सोय असलेल्या जमिनीत सरासरी ६० आणि कोरडवाहू जमिनीत जेमतेम ३० टक्क्यांपर्यंत कापूस उत्पादन होईल. ऑगस्टमधील पावसाच्या ओढीमुळे कापूस पिकाची चांगली वाढ झाली नाही. माघारी मोसमी पाऊस अथवा बिगरमोसमी पाऊस न झाल्यामुळे कापसाची बोंडे लहान राहिली आहेत. आता पाण्याअभावी पाने गळून पडू लागली आहेत. अनेक ठिकाणी कापसाचे पीक करपून गेले आहे. यंदा लाल बोंडअळीचा प्रादुर्भाव नाही. पण, पाऊस नसल्यामुळे करपा आणि अळीचा प्रादुर्भाव आहे. पाण्याअभावी सिंचनाची सोय असलेल्या जमिनीत उत्पादनात ३० टक्क्यांपर्यंत, तर कोरडवाहू जमिनीत उत्पादनात ६० टक्क्यांपर्यंत घट येण्याचा अंदाज आहे. साखरखेर्डा (ता. सिंदखेडराजा, जि. बुलडाणा) येथील शेतकरी देविदास पांचाळ म्हणाले, की विदर्भासह अमरावती भागात यंदा चांगला पाऊस झाला. पावसाने सरासरी भरून काढली; पण कमी दिवसांत, जास्त पाऊस झाल्यामुळे जमिनीत चांगली ओल तयार झाली नाही. पाणीपातळी वाढली नाही. सिंचनासाठी आता पाण्याचा तुटवडा जाणवत आहे. कापसाची वेचणी दिवाळीनंतर सुरू होईल.